**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपुरात
- विधानभवन परिसरातल्या प्रवेशांवर निर्बंध लागू होणार, सदस्यांसाठी नीतीमूल्य समितीचीही स्थापना
- छत्तीसगडमधल्या दारू घोटाळ्याप्रकरणी माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या मुलाला ईडीकडून अटक

**आणि**

- Indian Institute of Creative Technology चं मुंबईत उद्घाटन, वेव्हज उपक्रमाचा कार्य अहवालही प्रकाशित

**<><><><><>**

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचं कामकाज आज संस्थगित झालं. विधिमंडळाचं यापुढचं, हिवाळी अधिवेशन नागपुरात ८ डिसेंबर पासून सुरू होणार आहे.

या अधिवेशनात विधानसभेच्या एकूण १५ बैठका झाल्या यात १३३ तास ४८ मिनिटं कामकाज झालं. अधिवेशन काळात १४ विधेयकं पुनर्स्थापित झाली, तर १५ विधेयकं संमत झाली. एक विधेयक मागं घेण्यात आलं.

विधानपरिषदेच्या १५ बैठका झाल्या, त्यात एकंदर १०५ तास कामकाज झालं आणि १२ विधेयकं मंजूर करुन तर ३ धन विधेयकं शिफारशीशिवाय विधानसभेकडे परत पाठवल्याचं सभापती राम शिंदे यांनी कामकाज संपवताना सांगितलं.

**<><><><><>**

विधान भवनात काल झालेल्या हाणामारीच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी नीतीमूल्य समिती स्थापन करण्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात केली. एका आठवड्यात याचा निर्णय होईल अशी घोषणा अध्यक्षांनी केली.

**- - होल्ड - नार्वेकर बाइट - -**

तसंच मंत्र्यांनीही विधिमंडळात बैठक घेऊ नये, असं आवाहनही अध्यक्षांनी केलं. हे प्रकरण विशेष अधिकार समितीकडे सुपूर्द करण्यात आलं आहे.

अध्यक्षांच्या सूचनेनंतर आमदार गोपीचंद पडळकर यांनी झालेल्या घटनेबद्दल खेद व्यक्त केला. तर या घटनेला आपण प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जबाबदार नाही असं आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलं. तरीही या घटनेचं आपल्याला वाईट वाटतं असं आव्हाड म्हणाले.

दरम्यान, याप्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासोबत आलेले नितीन देशमुख आणि गोपीचंद पडळकर यांच्यासोबत आलेले सर्जेराव टकले यांच्याविरोधात मरीन ड्राइव्ह पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे दोघेही विधिमंडळात अनधिकृतपणे आले होते.

सभापती राम शिंदे यांनी विधान परिषदेत याविषयावर निवेदन दिलं.

**<><><><><>**

पुढची हजारो वर्षे कुणीही मुंबईला महाराष्ट्रापासून तोडू शकत नाही असं स्पष्ट करत मुंबईत मराठी माणसाचाच आवाज बुलंद राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत दिली. विरोधी पक्षाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर झालेल्या चर्चेला ते उत्तर देत होते. विरोधकांनी सभागृहात आरोप करताना नीट पुरावे द्यावेत, सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करायला हवा, मात्र चर्चेत कोणतेही पुरावे न देता नुसतेच आरोप करण्यात आले, असं ते म्हणाले.

विधिमंडळ परिसरात झालेल्या मारामारीच्या घटनेमुळे आपल्याला वेदना झाल्या असून, याबाबत चिंतन करायची गरज असल्याचं मत त्यांनी मांडलं.

**होल्ड - फडनवीस बाइट - -**

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध आपण केला असून याला सरकार पुरस्कृत दहशतवाद म्हणणं योग्य नाही, राज्यात हनी ट्रॅपची एकही घटना झालेली नाही, केवळ नाशिकमध्ये, एका महिलेनं एका उपजिल्हाधिकाऱ्याविरुद्ध तक्रार केली होती, ती तिनं मागे घेतली, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

विधान परिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिलं. सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण अधिवेशनात येतो. त्यावर गांभीर्याने चर्चा होणं अपेक्षित होतं. विरोधी पक्ष हे लोकशाहीचं दुसरं चाक आहे. मात्र त्यात बिघाड झाला आहे, अशी टीका त्यांनी केली.

राज्यात फक्त मराठी सक्तीची आहे, हिंदी नाही. याबाबतचा शासन आदेशही मागे घेतला आहे, मात्र विरोधकांचं मराठी प्रेम महापालिका निवडणुका आल्यावर उफाळून येतं, असं शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

जनसुरक्षा विधेयक हे लोकशाही पद्धतीने, विरोधी पक्षांच्या सदस्यांचं म्हणणं ऐकून घेऊन तयार केलं गेलं, याबाबतच्या समितीतल्या कुणीही असहमती दर्शवली नाही, मात्र विरोधकांनी नंतर दबाव आल्यामुळे सभागृहात वेगळी भूमिका घेतली, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी पावसाळी अधिवेशनानंतर वार्ताहरांशी बोलताना केला.

जनसुरक्षा कायद्यात कसलीही स्पष्टता नसल्यानं त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे, त्यामुळे या कायद्याला विरोध असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, या विधेयकाच्या विरोधात असलेला जनप्रक्षोभ लक्षात घेऊन राज्यपालांनी त्याला मान्यता देऊ नये आणि ते पुनर्विचारासाठी शासनाकडे परत पाठवावं अशी विनंती महाविकास आघाडीच्या आमदारांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांना केली.

<><><><><>

देशातल्या मागास भागाच्याच नव्हे तर मागसवर्गाच्या विकासाकरता रालोआ सरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. बिहारमधे मोतिहारी इथं ते जाहीर सभेत बोलत होते. बिहारमधे पूर्वी जंगलराज होतं, याची आठवण तरुणांनी ठेवावी, असं सांगत त्यांनी 'समृद्ध युवा, समृद्ध बिहार' ही घोषणा दिली. या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी सातहजार दोनशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमीपूजन आणि लोकार्पण केलं.

<><><><><>

घरात रोकड आढळल्याने वादग्रस्त ठरलेले न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. वर्मा यांच्या आरोपांची चौकशी करणाऱ्या त्रिसदस्यीय अंतर्गत समितीच्या निष्कर्षाला आव्हान देणारी याचिका त्यांनी दाखल केली आहे. या समितीने पूर्वग्रहावर आधारित चौकशी केली असून आपल्याला बाजू मांडण्याची पुरेशी संधी दिली नाही, असं त्यांचं म्हणणं आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सरकार वर्मा यांच्या विरुद्ध महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव मांडण्याची शक्यता असताना ही याचिका दाखल झाली आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या दारु घोटाळ्याशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याला ईडीच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. त्याला रायपूरच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आलं. ईडीनं पाच दिवसांची रिमांड मागितली. ती न्यायालयानं मंजूर केली.

झारखंडमधे हजारीबाग जिल्हा खनिकर्म कार्यालयात ईडीनं आज छापा टाकला. त्याआधी ईडीनं बर्कागावच्या माजी आमदार अंबा प्रसाद आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या घरांवरही छापे टाकले.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यात सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत ६ माओवादी ठार झाले आहेत. सुरक्षादलांनी त्या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात रायफली जप्त केल्या आहेत. अबुझमाड भागात दुपारी ही चकमक झाली. अजूनही काही माओवादी त्या भागात लपलेले असल्याचा संशय असून त्यांचा शोध सुरु आहे.

**<><><><><>**

मुंबई शहर चित्रपट आणि सर्जनशीलतेची राजधानी असून सर्जनशील अर्थव्यवस्थेत कामासाठी धडपडणाऱ्यांना साधनसामुग्री आणि प्रशिक्षण देण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. मुंबईच्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ कार्यालयाच्या परिसरात आज इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. केंद्र सरकारने मे महिन्यात आयोजित केलेल्या वेव्हज उपक्रमाचा कार्य अहवालही यावेळी प्रकाशित करण्यात आला. तसंच, महामंडळाच्या आवारातल्या भारतीय चित्रपट संग्रहालयामध्ये भारत पॅव्हेलियनचं

उद्घाटनही करण्यात आलं. IICT साठी तंत्रज्ञान क्षेत्रातल्या विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारी केल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव- -**

केंद्र सरकारने मे महिन्यात घेतलेल्या वेव्हज् या उपक्रमामुळे सर्जनशील अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली. IICT चे पहिले अभ्यासक्रम ऑगस्ट महिन्यापासून सुरु होणार आहेत. या संस्थेत १८ प्रकारचे अभ्यासक्रम शिकवले जातील, ज्यात गेमिंग, पोस्ट प्रॉडक्शन, ॲनिमेशन, कॉमिक्स, एक्स्टेंडेड रियालिटी अशा क्षेत्रांशी संबंधित विषयांचा समावेश असेल.

**<><><><><>**

गोव्यात होणारा ५६व्या ‘इफ्फी’च्या सुकाणू समितीची पहिली बैठक आज मुंबईत झाली. बैठकीच्या अध्यक्षपदी माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव होते. सुकाणू समितीचा विस्तार करण्यात आला असून सदस्यांची संख्या १६ वरून ३१ करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**